महाराष्ट्र शासन

**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद**

**पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५**

दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९

Email Id: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र.:विकाऔ/शिक्षण/२०२२/ १४११ दिनांक :

**अतितात्काळ/अत्यंत महत्वाचे**

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र/औषधनिर्माणशास्त्र/एच.एम.सीटी./सरफेस कोटींग टेक्नॉलॉजी/ वास्तुशास्त्र व हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरींग टेक्नॉलॉजी/बी.प्लॅनींग/एम.ई/एम.टेक/एम.फार्म/फार्म डी/एम.आर्किटेक्चर/ एच.एम.सी.टी./एम.बी.ए./एम.एम.एस./एम.सी.ए. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था,

(औरंगाबाद विभाग)

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील तांत्रिक/व्यावसायीक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी लागणारी आवश्यक प्रमाणपत्रे.**

संदर्भ १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई-१ यांचे पत्र क्रमांक:१०/ एडीएम/प्रमाणपत्रे/२०२२/३८९,दिनांक २३/०५/२०२२.

२. मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई श्री. उदय सामंत, यांचे पत्र दि.०१/०६/२०२२.

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्राचे अनुषंगाने या कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व संस्थांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील तांत्रिक/व्यावसायीक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी लागणारी आवश्यक प्रमाणपत्रे व त्यासंबंधी असलेले सक्षम प्राधीकारी याबाबतचे सुचना पत्र मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी वरील संदर्भान्वये प्रसिध्द केले आहे. (संदर्भिय पत्र सोबत जोडले आहे.)

त्याअनुषंगाने सर्व संस्था प्रमुखांनी खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

- सदर संदर्भिय पत्र संस्थेच्या संकेतस्थळावर अपलोड करावे, जेणेकरुन जास्तीत जास्त विदयार्थ्यांपर्यंत माहिती पोहोचू शकेल.
- सर्व संस्थांनी त्यांच्या जिल्हयातील दैनिकांमधून सदर माहिती प्रसिध्द करावी.
- विविध समाज माध्यमांमधून सदर माहिती प्रसिध्द करुन जास्तीत जास्त विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत प्रसारीत करावी.
- सर्व संस्थांनी स्कुल कनेक्ट कार्यक्रमा अंतर्गत तयार केलेल्या विद्यार्थी/पालक यांच्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर सदर पत्र व सोबत जोडलेले मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई श्री.उदय सामंत, यांनी दिलेले संदेश पत्र प्रसारीत करावे.

सर्व संस्था प्रमुखांनी वरील मुद्यांच्या आधारे प्रथम प्राधान्याने कार्यवाही करुन त्याचा कार्यपुर्ती अहवाल ०७ दिवसाच्या आत या कार्यालयास विनाविलंब सादर करावा.

**सोबतः- संदर्भिय पत्र.**

(उमेश नागदेवे)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ३, महापालिका मार्ग, मुंबई-१ यांना माहितीस्तव सविनय सादर.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४३०/४६५
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**प्रवेशासंबंधी महत्वाची सूचना**

क्रमांक: १०/एडीम/प्रमाणपत्रे/२०२२/३८९ दिनांक : २३.०५.२०२२

**शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी लागणारी आवश्यक प्रमाणपत्रे**

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभ्यासक्रम, प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. औषधनिर्माणशास्त्र,एच.एम.सी.टी.,सरफेस कोटींग टेक्नॉलॉजी पदविका अभ्यासक्रम तसेच प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी / तंत्रशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी, प्रथम वर्ष वास्तुशास्त्र, बी.प्लॅनिंग पदवी अभ्यासक्रम (Under Graduate), प्रथम वर्ष एम.ई./एम.टेक.,एम.फार्म.,फार्म.डी.,फार्म.डी.(PostBaccalaureate),एम.आर्किटेक्चर,एम.प्लॅनिंग,एम.एचएमसीटी एमबीए/एमएमएस, एमसीए हे पदव्युत्तर पदवी (Post Graduate) या अभ्यासक्रमांचे प्रवेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमधून करण्यात येतात. त्यासाठी अर्ज करतांना प्रवेश नियमावलीत नमूद केलेल्या आवश्यक त्या प्रकरणी लागू असणारी खालील प्रमाणपत्रे सक्षम प्राधिका-यांकडून प्राप्त करुन घेऊन ती तयार ठेवण्याबाबत प्रवेशोच्छुक उमेदवारांना याद्वारे सूचित करण्यात येत आहे.

१) जात /जमात प्रमाणपत्र ( Caste /Tribe Certificate ) (महाराष्ट्रातील सक्षम प्राधिकारी यांनी विहीत प्रपत्रात निर्गमित केलेले )

२) जात/जमात वैधता प्रमाणपत्र (Caste / Tribe Validity Certificate ) (महाराष्ट्रातील सक्षम प्राधिकारी यांनी विहीत प्रपत्रात निर्गमित केलेले ).

टिप :

अ) १० वी व १२ वी नंतरच्या पदविका प्रवेशासाठी जात/ जमात वैधता प्रमाणपत्र आवश्यक नाही. (मात्र प्रथम वर्ष पदविका किंवा द्वितीय वर्षातील पदविका अभ्यासक्रमाच्या राखीव जागेवर प्रवेश मिळालेल्या मागासवर्गीय उमेदवाराने प्रवेश मिळाल्यापासून १ महिन्याच्या आत जात/ जमात प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी संबंधित जात / जमात पडताळणी समितीकडे योग्य भरलेला अर्ज सादर करावा लागेल.)

ब) पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या मागासवर्गीयांसाठीच्या राखीव जागेवर प्रवेशासाठी मागासवर्गीय उमेदवाराने जात/जमात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

३) नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र (Non- Creamy Layer Certificate) ( दिनांक ३१ मार्च २०२३ पर्यंत वैध ) (अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती व्यतिरिक्त उर्वरीत सर्व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ) [राज्याबाहेरील मागासवर्गीय उमेदवारांचा अधिवास महाराष्ट्र राज्यात असला तरी महाराष्ट्र राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीच्या आरक्षणाचे धोरण त्यांना लागु नाही.]

४) अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) - प्रवेश नियमावलीत नमूद केलेल्या प्रकरणी आवश्यकतेनुसार.

५) उत्पन्नाचे प्रमाणपत्र (Income Certificate) - TFWS योजनेअंतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणा-या उमेदवारांसाठी सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले .

६) आर्थिकदृष्टया दुर्वल घटक प्रवर्गासाठी (EWS) महाराष्ट्र राज्याच्या शासन निर्णयास अनुसरून विहीत केलेल्या प्रपत्रात सक्षम प्राधिका-यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र.

७) अपंगत्याचे प्रमाणपत्र (Person with Disability) - आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकारी यांनी विहीत प्रपत्रात निर्गमित केलेले.

८) सैन्य दलातील/(Defence) संवर्गातून प्रवेश घेऊ इच्छिणा-या उमेदवारांच्या प्रवेशासाठी माहिती पुस्तिकेत दिलेले सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र.

९) अल्पसंख्यांकासाठी (Minority) संवर्गातून प्रवेश घेऊ इच्छिणा-या उमेदवारांच्या प्रवेशासाठी माहिती पुस्तिकेत दिलेले सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र.

१०) आधार क्रमांक व संलग्नित बँक खाते : शिष्यवृत्ती, शुल्क प्रतिपूर्ती इ. योजनांची रक्कम थेट लाभार्थीच्या खात्यात जमा होण्यासाठी आवश्यक.

<u>इशारा :</u> शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये काही उमेदवारांनी प्रवेश प्रक्रियेदरम्यान काही प्रमाणपत्रे जसे जात / जमात प्रमाणपत्रे / जात वैधता प्रमाणपत्रे /अपंगत्वाचे प्रमाणपत्र / नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्रे ही,सक्षम प्राधिका-याकडून प्राप्त करून न घेता बनावट प्रकारची प्रमाणपत्रे सादर केल्याचे पडताळणीअंती आढळून आले होते अशा उमेदवारांचा प्रवेश रद्द करून त्यांचेविरूध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. प्रवेशोच्छुक उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सक्षम प्राधिका-याकडूनच प्रमाणपत्रे प्राप्त करून घ्यावीत. बनावट अथवा खोटी प्रमाणपत्रे प्रवेशासाठी सादर केल्याचे आढळल्यास अशा उमेदवारांचे प्रवेश रद्द करून त्यांचे विरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

वेगवेगळया वर्गवारी अंतर्गत प्रवेशासाठी आवश्यक असणा-या प्रमाणपत्रांची तपशीलवार माहीती प्रवेश पुस्तिकेत अंतर्भुत असते. त्याचा तपशील संचालनालयाच्या http://www.dtemaharashtra.gov.in व राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या http://www.mahacet.org तसेच प्रवेश नियामक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या http://www.maha-ara.org या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : माहितीसाठी सादर

१. मा. प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
२. मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई
३. मा.सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी :

१. सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर- त्यांना कळविण्यात येते की, वरील सूचना आपल्या संकेतस्थळावर प्रदर्शित करावी. तसेच आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना याबाबत कळविण्यात यावे.
२. कार्यासन क्र.२अ, मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहितीसाठी.
३. कार्यासन क्रमांक ३ यांना माहितीसाठी व संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

**मंत्री**
**उच्च व तंत्रशिक्षण**
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : ०१/०६/२०२२

प्रिय विद्यार्थी/ मित्र- मैत्रिणी,

आज आपण शालेय शिक्षण पुर्ण करुन उच्च शिक्षणाच्या उंबरठ्यावर उभे आहात. उच्च शिक्षणाच्या असंख्य वाटा आपणासमोर आहेत. त्यातून आपल्या आवडीची, आपल्या ज्ञानाचा व आपल्या मधील कौशल्यास पैलू पाडून आपणास प्रगतीकडे अग्रेसर करणारी शिक्षणाची वाट आपणास निवडायची आहे. आपला ह्या क्षणीचा निर्णय आपल्या पुढील आयुष्याची दिशा ठरविणारा असतो. तथापि, या महत्वपूर्ण क्षणी आपली अवस्था संभ्रमाची असू शकते.

विद्यार्थ्यांना प्रगतीपथावर नेणाऱ्या बहुसंख्य विद्याशाखांपैकी तंत्र शिक्षण ही एक विद्या शाखा आहे. या विद्याशाखेतून आपणांस तंत्रज्ञ, अभियंता व उदयोजक होता येते व देश उभारणीत आपला खारीचा वाटा उचलता येतो.

१० वी नंतर कमी कालावधीचे तंत्रशिक्षण घेवून अभियंता होण्यासाठी व तद्नंतर नोकरी किंवा उद्योग उभारण्यासाठी तंत्रशिक्षणातील पदविका अभ्यासक्रम हा एक उत्तम पर्याय आहे. हा पदविका अभ्यासक्रम १० वी नंतर तीन वर्षाचा असतो व हा अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर आपणांस औद्योगिक क्षेत्रात रोजगाराच्या उत्तम संधी उपलब्ध होतात. आपण सुपरवायझर ते ज्युनियर मॅनेजर पदापर्यंत जावू शकतो वा आपला स्वत:चा उद्योग सुरु करुन आपणांस उद्योजक सुध्दा होता येते. या अभ्यासक्रमाच्या विविध शाखा उपलब्ध असून त्यात मुख्यत्वे सिव्हील, इलेक्ट्रीकल, मेकॅनिकल, अणुविद्युत, कॉम्प्युटर, केमीकल या मुख्य शाखा आहेत. त्यांच्या इतर सर्व शाखा या मुख्य शाखेच्या अंतर्गत उपशाखा आहेत. आपण आपल्या आवडीप्रमाणे शाखा निवडून अभ्यासक्रमास प्रवेश घेवू शकतो. अभ्यासक्रम पुर्ण करण्यासाठी आपणास आपल्या पात्रतेच्या निकषानुसार विविध शिष्यवृत्ती शासनातर्फे देण्यात येतात, त्याचा सुध्दा तुम्हाला शिक्षण पुर्ण करण्यासाठी आर्थिक मदत होऊ शकते. पदविका शिक्षणानंतर पुढील शिक्षणासाठी आपणांस अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या थेट द्वितीय वर्षात पात्रतेनुसार प्रवेश घेण्याची संधीही उपलब्ध आहे. पदविका अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासाठी तंत्रशिक्षण विभागाच्या dte.maharashtra.gov.in या संकेतस्थळास भेट द्या व तेच संकेतस्थळ वापरून आपला प्रवेश गुणवत्तेनुसार निश्चित करा.

आपण तंत्रशिक्षणाची वाट धरुन उत्तम अभियंते व तांत्रिक बाबीत उच्चशिक्षित होऊन रोजगारक्षम / उद्योजक व्हावे, ही सदिच्छा।

आपल्या भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा।

(उदय सामंत)